प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

# विकसित भारताचे ध्येय गाठण्यासाठी पुढाकार घ्या

## व्यावसायिक अमरीश कक्कड यांचे विद्यार्थ्यांना आवाहन



चिंचवड, दि.१६ (वार्ताहर) - कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटमध्ये ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण प्रख्यात व्यावसायिक अमरीश कक्कड यांच्या हस्ते झाले. संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा, प्राचार्य व शिक्षकांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक परेड सादर करून सर्वांची मने जिंकली.

यावेळी बोलताना अमरीश कक्कड म्हणाले की, देशाच्या प्रगतीत युवकांची भूमिका महत्त्वाची आहे. पर्यावरण संरक्षण, स्वच्छता व सामाजिक जबाबदाऱ्या पेलण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा. केवळ स्वप्न पाहून चालणार नाही, त्यासाठी कृती करणे आवश्यक आहे.

यावेळी संस्थेतील गुणवंत विद्यार्थी, शिक्षक व खेळाडूंचा गौरव करण्यात आला. डॉ. हर्षिता वाच्छानी यांच्या नेतृत्वाखाली १सायबर वॉरियर्स पथकाने सायबर सुरक्षेबाबत जनजागृती शपथ दिली. अध्यक्षीय भाषणात डॉ. दीपक शहा यांनी सामूहिक योगदानातूनच विकसित भारताचे स्वप्न साकार होईल, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ . सुवर्णा गायकवाड यांनी केले. पाहुण्याचा परीचय प्रा. मनीषा पाटील यांनी दिला. आभार प्रा. पल्लवी चव्हाण यांनी मानले.